एक महत्त्वाची बाब आहे. आतापर्यंत वैयक्तिक शेतकऱ्यांना तंत्रज्ञान देण्याची पद्धत अवलंबिली गेली. त्यामुळे सुधारित तंत्रज्ञानाचा प्रसार व वापर यावर मर्यादा आली. काही शेतकरी उत्पादकतेचा उच्चांक गाठीत असताना सर्वसामान्य शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी झाले ही वस्तुस्थिती आहे. शेती हे खऱ्या अर्थाने शास्त्र आहे. म्हणूनच ते समजून उमजून अमलात आणण्याची गरज आहे. वेळेवर व सुलभ कर्ज पुरवठा, गुणवत्तापूर्ण निविष्ठांचा वेळेवर पुरवठा, मजुरांची उपब्धता, पेरणी ते काढणीपर्यंत आवश्यक असलेली यंत्र सामुग्रीची उपलब्धता, पीक संरक्षणाची व्यवस्था, ग्रेडिंग / पॅकिंगची सोय, बाजारपेठेची अद्ययावत माहिती या सर्व आनुषंगिक बाबींशिवाय सध्याच्या काळातील शेती किफायतशीर होणार नाही. परंतु वैयक्तिकरित्या लहान शेतकऱ्यांना अशी व्यवस्था करणे शक्य आणि व्यवहार्य होत नाही; त्याचप्रमाणे शासनाच्या अनेक योजना आहेत. या योजनांचा लाभ घेण्यासाठी व तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यासाठी शेतकऱ्यांनी एकत्र यायला हवे.

वरील सर्व पार्श्वभूमीवर **गटशेती** हा एक चांगला पर्याय आहे. आतापर्यंत सामूहिक शेती, सहकार शेती, कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग असे अनेक प्रयोग करण्यात आले; परंतु त्या प्रत्येकाची एक विशिष्ट मर्यादा होती. त्यामुळेच त्यांचा फार मोठा प्रसार होऊ शकला नाही. मात्र गटशेती ही सुटसुटीत, जमिनीचा मालकी हक्क कायम ठेवणारी, उत्पन्नावर संपूर्ण हक्क असणारी आणि समविचारी शेतकऱ्यांना स्वयंस्फूर्तीने एकत्र आणणारी पद्धत असल्याने ती सहजपणे स्वीकारली जात आहे.

शेतकऱ्यांसाठी खरी गरज त्यांच्यात जनजागृती निर्माण करणे, अद्ययावत ज्ञानाची उपलब्धता करून सक्षम करणे, क्षमतावृद्धी करणे, आवश्यक सामग्रीची उपलब्धता करून त्यांना अधिक कार्यक्षम करणे ही आहे. शेतकऱ्यांनी शेतीचे नवीन तंत्रज्ञान, सामाजिक व शैक्षणिक बाबी यावर निश्चित वेळी एकत्र येऊन विचार करणे आवश्यक आहे.

याबाबत शासनाने यामध्ये पुढाकार घेऊन समाविष्ट शेतकऱ्यांना पिकाची निवड ते बाजारभाव यापर्यंतच्या सर्व टप्प्यांवर माहिती आणि प्रशिक्षण या मुख्य घटकांवर लक्ष केंद्रित करण्यास प्राधान्य देण्याचे धोरण स्वीकारले आहे.

राज्यातील अनेक ठिकाणी गटशेतीस सुरूवात देखील झालेली आहे. काही जिल्ह्यांत एका ठरावीक पिकाची निवड करून पीकनिहाय गटशेतीस सुरूवात झाली आहे. अशा गटातील शेतकरी एकत्र येऊन निवडलेल्या एका पिकाच्या वाणाची निवड करून त्यासाठी लागणारे बियाणे, खते, औषधे यांची एकत्रित खरेदी करतात. त्यामुळे त्यांना गुणवत्तापूर्ण निविष्ठा अत्यंत वाजवी भावात उपलब्ध होत आहेत. पीक उत्पादन वाढीचे आधुनिक तंत्रज्ञान कृषी विभागामार्फत अशा गटास पुरविले जाते आणि त्याचा गटामार्फत प्रभावी अवलंब होतो. उत्पादित माल देखील दूरच्या बाजारपेठेपर्यंत एकत्रितरित्या पाठविणे, हे समाविष्ट सर्व शेतकऱ्यांना त्यामुळे सहज शक्य होते. त्यामुळे वाहतूक, जकात व हाताळणीच्या खर्चात फार मोठी बचत होते. एकदा असे गट सक्षम झाले आणि त्यांच्यात संपूर्णत: पारदर्शकपणा आल्यास जबाबदारीचे वाटपही होऊ शकते. उदा. निविष्ठांची खरेदी एकाने करावयाची, पीकसंरक्षण दुसऱ्याने करावयाचे, वाहतुकीची व्यवस्था तिसऱ्याने करावयाची, चौथ्याने फक्त बाजारपेठेचा शोध घेऊन मालाची विक्री करावयाची. यामुळे एकाच गोष्टीसाठी अनेकांचे वाया जाणारे कष्ट आणि वेळेचा अन्य महत्त्वाच्या गोष्टींसाठी सदुपयोग होईल. शेतमालाचे वर्गीकरण, पॅकिंग, ग्रेडिंग, प्राथमिक प्रक्रिया आणि उत्पादक ते ग्राहकांपर्यंत थेट संपर्क असे पुढील टप्पे आहेत. गटशेतीसाठी शेतकरी गटांची स्थापना व त्यांच्या नियमित बैठका, त्यांना एकत्र ठेवण्यासाठी ठरावीक मासिक वर्गणी, कामकाजाची व व्यवहाराची नोंद यासाठी क्षेत्रीय कर्मचाऱ्यांकडून सहकार्य करण्यात येणार आहे. स्थापन केलेल्या गटांच्या कामकाजावर जाणीवपूर्वक लक्ष ठेवून त्यांच्या नोंदी करून असे गट बँकेशी जोडण्यात येतील. नाबार्डसारख्या बँकेकडे समूह गटासाठी अनेक योजना आहेत. त्यासाठी हे गट कर्ज पुरवठ्यासाठी पात्र करून अल्प व्याजदराने व विनातारण ठेवीच्या तीन/चार पट कर्ज उपलब्ध होऊ शकेल. संयुक्त दायित्व गटाच्या माध्यमातून कर्जाची उपलब्धता वेळेत होऊन उत्पादनवाढ व गुणवत्ता राखता येईल.

भविष्यामध्ये शेतीचा व्यवसाय हा वैयक्तिक स्वरूपाचा न राहता तो गटशेतीमध्ये रुपांतरित होईल, या दृष्टीने पावले टाकण्याची गरज असून त्यास आता पर्याय नाही. गटशेतीमध्येदेखील पुढे जाऊन कामाचे/ जबाबदारीचे वाटप करून गटशेती ही खऱ्या अर्थाने व्यावसायिक शेती करता येऊ शकेल. पुण्याच्या जवळ श्री ज्ञानेश्वर बोडके यांनी फुलशेतीमध्ये, बीड आणि औरंगाबाद जिल्ह्यांत तरुण शेतकऱ्यांनी फळबाग, भाजीपाला यांमध्ये यशस्वी प्रयोग केले असून त्या धर्तीवर राज्यात इतरत्र स्थानिक परिस्थितीनुरुप गटशेती करणे निश्चितपणे शक्य आहे; किंबहुना ती काळाची गरज आहे. ग्रामीण भागात सध्या अस्तित्वात असलेल्या महिला व तरुणांचा बचतगट यांचा सेवा पुरवठादार (सर्व्हिस प्रोव्हायडर) म्हणून अत्यंत चांगला उपयोग होऊ शकतो; ज्यामुळे रोजगार निर्मिती करता येईल. यामध्ये पिकांची लागवड करून देणे, मालाची काढणी करणे, ग्रेडिंग व पॅकिंग करणे इ. कामांसाठी महिलांच्या बचत गटांची मदत होऊ शकते. यामुळे विहित मुदतीत व वेळेवर गुणवत्तापूर्ण कामे होण्यास मदत होईल. याचबरोबर कुशल स्वरूपाच्या कामांसाठी गावातच सेवा पुरवठादार निर्माण करून त्यांच्यामार्फत कुशल व महत्त्वपूर्ण शेतीकामे करणे सहज शक्य आहे. उदा. औषधांची फवारणी. एखाद्या तरुणांच्या गटास औषधाची मात्रा कशी वापरावयाची, किती पाणी द्यावयाचे आणि फवारणी कशा पद्धतीने करावयाची याचे अल्प मुदतीचे प्रशिक्षण दिले, तर पीक संरक्षणाचे